**महाराष्ट्र शासन – सार्वजनिक आरोग्य विभाग**

**राज्य आरोग्य माहिती व जीवनविषयक आकडेवारी कार्यालय,**

डॉ. नायडू सांसर्गिक रुग्णालय आवार, केनेडी रोड, पुणे -४११ ००१

उपसंचालक आरोग्य सेवा<br>(आमाजिआ)<br>तथा उपमुख्य निबंधक<br>(जन्म व मृत्यू) महाराष्ट्र राज्य

संकेतस्थळ - arogya.maharashtra.gov.in<br>
कार्यालय ☎ :- ०२० - २६०५९५३०<br>
कायदा विभाग ☎ :- ०२० - २६०५८६१०<br>
नानोप विभाग ☎ :- ०२० - २६०५८२९२<br>
ई-मेल crs_d83@yahoo.com


**<u>आरोग्य सेवा</u>**

जा.क्र.आमाजिआ/कक्ष-८३/जन्म-मृत्यू नोंदणी /२०२७७-३४५/१९<br>
दिनांक:- 31/ 12 /२०१९

प्रति,

१) जिल्हा आरोग्य अधिकारी तथा जिल्हा निबंधक, जन्म व मृत्यू,<br>
जिल्हा परिषद ..............(सर्व)

२) कार्यकारी आरोग्य अधिकारी तथा निबंधक, जन्म व मृत्यु,<br>
बृहन्मुंबई महानगरपालिका, मुंबई.

३) वैद्यकीय आरोग्य अधिकारी तथा निबंधक, जन्म व मृत्यु,<br>
महानगरपालिका,.....(सर्व)

विषय :- **<u>जन्म-मृत्यू नोंदणी घटनांच्या नोंदीबाबत.</u>**

संदर्भ १) महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरोग्य विभाग, अधिसूचना दिनांक १२/०४/२०१८.<br>
२) मा. संचालक आरोग्य सेवा पुणे यांचे प.क्र.आसे-२/१६४७५-१६५१८/१९ दिनांक १६/१२/२०१९.

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्या संदर्भिय अधिसूचनेनुसार राज्यातील सर्व शासकीय आरोग्य संस्थेतील जिल्हा रुग्णालये, सामान्य रुग्णालये, वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालये, उपजिल्हा रुग्णालये, स्त्री रुग्णालये, ग्रामिण रुग्णालये व प्राथमिक आरोग्य केंद्रे येथील संस्था प्रमुखांना त्यांच्या रुग्णालयीन इमारतीत व रुग्णालयीन परिसरात घडणा-या जन्म-मृत्यू घटनांच्या नोंदीसाठी निबंधक, जन्म व मृत्यू म्हणून नेमणूक करण्यात आली आहे.

जिल्हा स्तरावरील नवनियुक्त निबंधकाचे प्रशिक्षण मा. संचालक आरोग्य सेवा पुणे यांचे संदर्भिय पत्रा नुसार दिनांक - ०४/०१/२०२० पर्यंत घेण्याबाबत आपणास सुचना दिलेल्या आहेत. जिल्हास्तरीय प्रशिक्षण झाल्यानंतर या अधिसूचनेनुसार प्रत्यक्ष शासकीय आरोग्य संस्था व तीच्या आवारातील जन्म/मृत्यू घटनांचीच नोंदणी नवनियुक्त निबंधकांनी करावी. त्यापूर्वीच्या घटनांची नोंदणी पूर्वीप्रमाणे ग्रामसेवक (ग्रामीण भागासाठी) व मुख्याधिकारी, वैद्यकीय आरोग्य अधिकारी, कार्यकारी आरोग्य अधिकारी यांनी (शहरी भागासाठी) करावी.

परिच्छेद क्रमांक १ मध्ये नमुद केल्यानुसार आता या पुढे शासकीय आरोग्य संस्थेतील व संस्था आवारातील जन्म-मृत्यू घटनांची नोंदणी त्या आरोग्य संस्थेचे प्रमुख करतील व प्रमाणपत्र अदा करतील.

शासकीय आरोग्य संस्थेच्या आवाराबाहेरील घटनांची नोंदणी पुर्वी प्रमाणे ग्रामीण भागातील व शहरी भागातील निबंधक करतील. व प्रमाणपत्र अदा करतील

या बाबत आपण जिल्हयातील सर्व निबंधक यांना कळवावे.

(डॉ.एन.डी.देशमुख)
उपसंचालक आरोग्य सेवा (आमाजीआ)
तथा उपमुख्य निबंधक जन्म व मृत्यू
महाराष्ट्र राज्य, पुणे-१.

प्रत सविनय सादर :

१) मा.आयुक्त तथा संचालक आरोग्य सेवा, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२) मा.संचालक, जनगणना कार्यालय, महाराष्ट्र राज्य मुंबई.
३) मा.संचालक आरोग्य सेवा तथा मुख्य निबंधक जन्म व मृत्यु, महाराष्ट्र राज्य, मुंबई
४) मा.संचालक, आरोग्य सेवा मध्यवर्ती इमारत, पुणे-१.

प्रत - जिल्हा शल्यचिकीत्सक तथा निबंधक, जन्म व मृत्यु, जिल्हा रुग्णालय, सर्व.....

*F:83/Circular.2019*